# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:25.10.2025** **वार:शनिवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत रोजगार मेळाव्यात 51 हजार युवकांना नियुक्तीपत्रांचं वाटप
2. बिहारमध्ये निवडणूक प्रचाराला वेग
3. आशियायी युवा क्रीडा स्पर्धेत भारताच्या मुली आणि मुलांच्या कबड्डी संघांना सुवर्ण पदक
4. मुलींच्या 100 मीटर अडथळ्यांच्या स्पर्धेत महाराष्ट्राच्या शौर्या अंबुरेला रौप्य पदक आणि
5. ओडिशामधल्या चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर सर्व जिल्हा प्रशासन आणि विभागांना सतर्कतेच्या सूचना

**रोजगार मेळावा**

केंद्र सरकारतर्फे देशभरात 40 ठिकाणी काल 17 व्या रोजगार मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात देशभरातील 51 हजार नवनियुक्त उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात आली. या रोजगार मेळाव्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्हिडीओ संदेशाद्वारे संबोधित केलं. देशाच्या युवावर्गाची स्वप्ने रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून पूर्ण होत आहेत, असं पंतप्रधान म्हणाले. रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून आतापर्यंत 11 लाख नियुक्त्या करण्यात आल्याचं सांगून मोदी म्हणाले....

**आज आपको केवल सरकारी नियुक्ति नहीं मिली है। आपको राष्ट्र सेवा में सक्रिय योगदान देने का अवसर मिला है। मुझे विश्वास है आप इसी भावना से काम करेंगे। ईमानदारी और शुचिता के साथ आप भविष्य के भारत के लिए बेहतर व्यवस्थाएं बनाने में अपनी भूमिका निभाएंगे।**

नागपूरमध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते टपाल विभागात नियुक्त झालेल्या 25 उमेदवारांना प्रातिनिधीक स्वरूपात नियुक्तीपत्र वितरित करण्यात आली. या कार्यक्रमात एकंदर 113 जणांना नियुक्तीपत्र देण्यात आली. पुण्यात झालेल्या कार्यक्रमात केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते 102 उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात आली.

**मोदी पुस्तक**

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे केवळ भारताचे नेते नाहीत, तर ते एक विचार आहेत, एक प्रेरणास्रोत आहेत. त्यांचं जीवन हे मानवतेच्या सेवेचं आणि राष्ट्रहितासाठीच्या अखंड समर्पणाचं उत्तम उदाहरण आहे, असं प्रतिपादन राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी काल मुंबईत केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जीवन प्रवासावर आधारित, प्रख्यात वकील बर्जिस देसाई लिखित 'मोदीज मिशन' या पुस्तकाचं प्रकाशन काल राज्यपालांच्या राजभवन इथं झालं; त्यावेळी ते बोलत होते. पंतप्रधान मोदी यांनी भारताच्या विकासाची जी पायाभरणी केली आहे, ती अवर्णनीय आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या वेळी केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**बिहार प्रचार**

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्याच्या प्रचाराला आता वेग आला आहे. या टप्प्यात येत्या 6 नोव्हेंबरला 18 जिल्ह्यांतील 121 विधानसभा मतदारसंघांमध्ये मतदान होणार आहे. सर्व पक्षांचे मुख्य प्रचारक वेगवेगळ्या जिल्ह्यांमध्ये सलग सभा

घेत आहेत. प्रचारात विकास, कायदा आणि सुव्यवस्था, बेरोजगारी, स्थलांतर आणि शिक्षणाच्या मुद्द्यांवर भर दिला जात आहे. भारतीय जनता पार्टीचे नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संयुक्त जनता दल पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि मुख्यमंत्री नीतीश कुमार, हिंदुस्तानी आवाम मोर्चाचे नेते आणि केंद्रीय मंत्री जितन राम मांझी यांच्यासह विविध पक्षांचे नेते आज ठिकठिकाणी निवडणूक सभांना संबोधित करतील.

**<u>निवडणूक आयोग</u>**

निवडणूक आयोगाने बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी राजकीय प्रचारात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि त्या आनुषंगिक सामग्रीचा उपयोग जबाबदारी काळजीपूर्वक करण्याच्या सूचना केल्या आहेत. या सामग्रीच्या निर्मितीसाठी जबाबदार असलेल्या संस्थेचे नाव मेटाडेटा किंवा सोबतच्या शीर्षकात ठळकपणे प्रदर्शित करणं आवश्यक आहे. कोणत्याही व्यक्तीची ओळख किंवा आवाज परवानगी शिवाय वापरणं तसंच ती सामग्री मतदारांना दिशाभूल करण्याच्या उद्देशाने तयार केलेल्या सामग्रीवर निर्बंध घालण्याचं आवाहन केलं आहे.  अशी सामग्री काढून टाकण्यासाठी आयोगानं राजकीय पक्षांना 3 तासांची मुदत दिली आहे. सर्व AI निर्मित प्रचार साहित्याच्या अंतर्गत नोंदी ठेवणंही  बंधनकारक करण्यात आलं आहे.

**<u>मसुदा विधेयक</u>**

सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं भारतीय सांख्यिकी संस्था विधेयक, 2025 च्या मसुद्यावर निवेदन किंवा सूचना सादर करण्याला मुदतवाढ देण्याची घोषणा केली आहे. नागरिक आपल्या सूचना किंवा निवेदन पुढील महिन्याच्या 3 तारखेपर्यंत मंत्रालयाला पाठवू शकतील. या सूचना सादर करण्यासाठी, मसुदा विधेयक, मंत्रालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या मसुदा विधेयकाचा उद्देश भारतीय सांख्यिकी संस्थेला नोंदणीकृत संस्थेतून कायदेशीर संस्थेत रुपांतरित करून तिचा संस्थात्मक दर्जा वाढवणे हा आहे.

**<u>गुंतवणूक</u>**

केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय पेन्शन योजना आणि एकात्मिक पेन्शन योजना या दोन्ही अंतर्गत एलसी75 आणि बीएलसी गुंतवणूक हे पर्याय वापरण्यास सरकारनं मान्यता दिली आहे. खाजगी नोकरीत असलेल्या कर्मचाऱ्यांप्रमाणेच केंद्र सरकारी सदस्यांनाही उपलब्ध असलेल्या गुंतवणूक पर्यायांच्या विस्तृत श्रेणीचा पर्याय देण्यात यावा, अशी मागणी सतत करण्यात येत होती. या मुळे निवृत्ती नियोजन सुलभ होईल आणि कर्मचाऱ्यांना वैयक्तिक गरजेनुसार निवृत्ती निधी व्यवस्थापन करण्यास मदत होईल. एनपीएस आणि यूपीएस अंतर्गत, केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांना आता विविध गुंतवणूक पर्यायांमधून निवड करता येणार आहे.

**<u>फॉरेक्स</u>**

भारताच्या परकीय चलनाची गंगाजळीत गेल्या आठवडा अखेर साडे चार अब्ज डॉलर्सनी वाढून 702 अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक झाली आहे. देशाच्या परकीय चलन साठ्याचा भाग म्हणून रिझर्व्ह बँकेजवळ असलेल्या सोन्याच्या साठ्यात वाढ होऊन तो 108 अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक झाल्यामुळे ही वाढ झाली आहे. तर युरो, पौंड आणि येन सारख्या चलनांमधील चढउतारांमुळे परकीय चलनाची गंगाजळी मात्र एक पूर्णांक 7 अब्ज डॉलर्सनी घटली असून ती 570 अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक आहे. याच काळात आंतरराष्ट्रीय नाणेनिधी सोबत भारताच्या राखीव साठयात तीन कोटी डॉलर्सची घट झाली असून ती सुमारे साडे चार अब्ज डॉलर्सवर पोहोचली आहे.

**<u>इस्रायल-लेबानन</u>**

इस्रायली संरक्षण दलानं काल दक्षिण लेबाननमध्ये केलेल्या हवाई हल्ल्यात हिज्बुल्लाचा वरिष्ठ कमांडर अब्बास हसन कार्की मारला गेला. हिजबुल्लाची ताकद वाढावी म्हणून चाललेल्या प्रयत्नांच्या मागे कार्कीचा मोठा हात होता, असा दावा इस्रायलनं केला आहे. इस्रायलनं या हवाई हल्ल्यात लेबनानच्या विशिष्ट तळास लक्ष्य केले होते. कार्की ठार झाल्याच्या वृत्ताला लेबनानच्या वृत्तसंस्थेनं दुजोरा दिला आहे.

**आईसीजी-गोवा**

भारतीय तट रक्षक दलाने काल गोवा शिपयार्ड लिमिटेडमध्ये दोन आधुनिक, तीव्र वेगाच्या ICG अजीत आणि ICG अपराजित या गस्ती नौकांचं जलावतरण केलं. 52 मीटर लांब असलेल्या या संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या नौका, मालिकेतील सातव्या आणि आठव्या क्रमांकाच्या असल्याची माहिती संरक्षण मंत्रालयानं दिली. सुमारे 320 टन वजनाच्या या नौका मासेमारांची सुरक्षा, किनारपट्टीवरील गस्ती, तस्करी आणि दरोडा प्रतिबंध तसंच शोध आणि बचाव कार्य अशा विविध कार्यांसाठी सक्षम आहेत.

**टपाल-शिंदे**

टपाल खात्याची स्पीड पोस्ट सेवा लवकरच 24 ते 48 तासांच्या आत उपलब्ध होईल अशी घोषणा केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी काल केली. गुजरातमधल्या एकता नगर मध्ये झालेल्या पश्चिम क्षेत्र ग्रामीण टपाल कर्मचारी सम्मलेनात, त्यांनी सभेला संबोधित केलं. मंत्र्यांनी टपाल कर्मचारी हे आधुनिक युगातील एकतेचे खरे प्रतीक असल्याचे गौरवोद्गार त्यांनी यावेळी काढले. नवीन खाते उघडण्यासाठी आणि टपाल वेळेत पोहोचवण्यासाठी उत्कृष्ट योगदान दिलेल्या कर्मचाऱ्यांचा शिंदे यांनी यावेळी सन्मान केला.

**आशियायी युवा क्रीडा**

बहारीनमध्ये सुरू असलेल्या आशियायी युवा क्रीडा स्पर्धांमध्ये 18 वर्षांखालच्या मुली आणि मुलांच्या भारतीय कबड्डी संघानं सुवर्ण पदक पटकावलं. मुलींच्या संघानं इराणला 75-21 असं 12 वर्षातल्या सर्वात मोठ्या फरकानं नमवलं. मुलांच्या संघानं इराणला 35-32 गुणांनी पराभूत केलं.

या स्पर्धेत मुलींच्या 100 मीटर अडथळ्यांच्या धावण्याच्या स्पर्धेत महाराष्ट्राच्या शौर्या अंबुरेला रौप्य पदक मिळालं. मिक्स्ड मार्शल आर्ट स्पर्धेत भारताच्या भादू नं आणि पुरुषांच्या 5 हजार मीटर चालण्याच्या स्पर्धेत पालक्ष मंडल नं कांस्य पदक पटकावलं. या स्पर्धेत भारत 2 सुवर्ण, 3 रौप्य आणि 7 कांस्य पदकांसह पदक तालिकेत पाचव्या स्थानावर आहे.

**ओडिशा-पाऊस**

ओडिशा सरकारनं बंगालच्या उपसागरावर उद्या अपेक्षित असलेल्या चक्रीवादळाच्या पार्श्वभूमीवर सर्व जिल्हा प्रशासन आणि विभागांना सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत. मदत साहित्याची पूर्तता करण्यात आली असून सर्व जिल्हा आयुक्तांना तसे निर्देश दिले असल्याचं महसूल आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री सुरेश पुजारी यांनी काल भुवनेश्वरमध्ये सांगितलं. भारतीय हवामान विभागानं आजपासून पुढे तीन दिवस ओडिशाच्या अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार ते अत्यंत जोरदार पावसाची पूर्वसूचना दिली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार..**